# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११

Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र- १११ दिनांक :- २४/०८/२०२६

# " पर्यावरण संवर्धनासाठी जळगाव पोलिसांचा पुढाकार; पोलीस फायरिंग ग्राउंड येथे १५०० झाडांचे भव्य वृक्षारोपण "

===ooo===

**जळगाव जिल्हा पोलीस दल व मॅरिको लिमिटेड, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन पोलीस फायरिंग ग्राउंड, जळगाव येथे करण्यात आले. या उपक्रमांतर्गत तब्बल १५०० झाडांचे भव्य वृक्षारोण**

दिनांक २१/०८/२०२६ रोजी ०४:०० वा जळगांव पोलीस फायरिंग ग्राउंड, जळगांव येथे **१५०० झाडांचे भव्य वृक्षारोण** कार्यक्रमाचे उद्‌घाटन जळगाव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक **मा. श्रीकांत धिवरे यांच्या हस्ते** आले असुन, यावेळी पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन व हरित जळगाव निर्मितीचा संदेश देण्यात आला.

१५०० झाडांची लागवड हा केवळ वृक्षारोपणाचा उपक्रम नसून, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दिशेने जळगाव पोलीस दलाने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्यावरही विशेष भर देण्यात येणार आहे.

कार्यक्रमास अपर पोलीस अधीक्षक श्री. संदीप गवित, जळगाव परिमंडळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. नितीन गणापुरे, पोलीस उपअधीक्षक (गृह) श्री. संजय गायकवाड (म.पो.से.), मॅरिको लिमिटेडचे वर्क हेड श्री. रविंद्र चोपडे, वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. रामकृष्ण लामगे, तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड व राखीव पोलीस निरीक्षक श्री. प्रशांत सुगरवार यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच श्रेणी पोलीस उपनिरीक्षक व सफौ/अतुल वंजारी यांनी वृक्षारोण कार्यक्रम यशस्वी विशेष परिश्रम घेतले.

***'हरित जळगाव... समृद्ध जळगाव!' या संकल्पनेतून पर्यावरणपूरक आणि सुंदर जळगाव घडविण्यासाठी सर्वांनी वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक यांचेकडुन करण्यात आले.***

**"झाडे लावा... झाडे जगवा"... पर्यावरण वाचवा... भविष्य घडवा!**

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, जळगांव**

*******************************************************************


जळगाव पोलीस